दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कोरपना या न्यायालयासाठी पदनिर्मिती करणेबाबत.....

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीआरसी २०१७/प्र.क्र.२३८/का.१२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १० एप्रिल, २०१८

वाचा-

१ शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्रमांकः सीआरसी १००७/प्र.क्र.८९/का.११, दिनांक २३.०८.२००७
२ शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्रमांकः सीआरसी १००७/६३०/(१४४)/का.३, दिनांक २६.१०.२००७
३ शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्रमांकः सीआरसी १७०७/११४३/(१५८)/का.बारा, दिनांक २३.११.२००७
४ शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्रमांकः सीआरसी १००७/६३०/(१४४)/का.तीन, दिनांक २१ जून, २००८
५ शासन अधिसुचना, विधि व न्याय विभाग क्रमांक सीआरसी १००९/(३७)/डी १२, दिनांक २९.०९.२००९
६ शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्रमांक सीआरसी २००९/प्र.क्र.३७/का.१२, दिनांक २७.०९.२०११
७ शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्रमांकः सीआरसी २०१८/प्र.क्र.५५/का.१२, दिनांक २३ मार्च, २०१८

प्रस्तावना-

कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथे दिनांक २ ऑक्टोबर, २००९ पासून ग्रामन्यायालय अस्तित्वात आहे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर राजूरा हे कोरपना, जिल्हा चंदप्रूर येथील ग्रामन्यायालयाचे कामकाज वेळोवेळी प्रत्यक्ष कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथे भेट देऊन पाहतात. प्रलंबित प्रकरणांची आवश्यक संख्या व पायाभूत सुविधा यांच्या विहीत प्रमाणकाची पूर्तता होत आहे, हे पाहून, ग्रामन्यायालय गडचांदूर, ता.कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथे ग्रामन्यायालयाऐवजी नियमित स्वरुपात दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे स्तरावर गठीत The Establishment of Courts Committee या समितीने घेतला. यापूर्वी संदर्भाधीन अ.क्र. १ येथे नमूद दिनांक २३ ऑगस्ट, २००७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील न्यायालय नसलेल्या तालुक्यांच्या ठिकाणी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामध्ये कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथील

न्यायालयाचा समावेश होता. संदर्भाधीन अ.क्र. २ येथे नमूद दिनांक २६ ऑक्टोबर, २००७ रोजीच्या शासन निर्णयान्वये ५३ तालुका न्यायालयांसाठी आवश्यक पद निर्मिती करण्यात आली होती. त्या अनुषंगाने संदर्भाधीन अ.क्र. ३ येथील दिनांक २३ नोव्हेंबर, २००७ रोजीच्या शासन निर्णयान्वये कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथे दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्य न्यायालयासाठी मर्यादीत कालावधीसाठी १५ पदे सुरु करण्यास मान्यता देण्यात आली होती. मात्र, संदर्भाधीन अ.क्र. ४ येथील दिनांक २१ जून, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक २६ ऑक्टोबर, २००७ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्यात येऊन सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यामध्ये कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथील न्यायालयासाठी पदनिर्मिती करण्यात आली नव्हती. संदर्भाधीन अ.क्र. ५ येथील दिनांक २९ सप्टेंबर, २००९ च्या अधिसुचनेन्वये कोरपना, जिल्हा चंद्रपूरयेथे ग्रामन्यायालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. संदर्भाधीन अ.क्र. ६ येथील दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामन्यायालयांसाठी पद निर्मिती करण्यात आली आहे. संदर्भाधीन अ.क्र. ७ येथील दिनांक २३ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथे अस्तित्वातील ग्रामन्यायालयाऐवजी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालय स्थापन करण्यास शासन मान्यता देण्यात आली. या न्यायालयासाठी पद निर्मिती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय-

शासन निर्णय, विधि व न्याय विभाग दिनांक २३ नोव्हेंबर, २००७ अधिक्रमित करण्यात येत आहे.

२. कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथे स्थापन करण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या न्यायालयासाठी १३ अस्थायी पदे न्यायालय सुरु होण्याच्या दिनांकापासून निर्माण करण्यास या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. पहारेकरी / सुरक्षारक्षक व सफाईगार या पदांची कामे बाह्ययंत्रणेद्वारे करण्यात यावी.

कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यान्यायालयासाठी पद निर्मिती

अ.क्र.	पदाचे नाव	पदांची संख्या	पदांची वेतनश्रेणी
१	दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग	१	२७७००-७७०-३३०९०-९२०-४०४५०-१०८०-४४७७०
२	सहायक अधिक्षक	१	९३००-३४८०० + ग्रेड पे ४४००
३	लघुलेखक निम्नश्रेणी	१	९३००-३४८०० + ग्रेड पे ४३००
४	वरिष्ठ लिपिक	२	५२००-२०२०० + ग्रेड पे २४००

अ.क्र.	पदाचे नाव	पदांची संख्या	पदांची वेतनश्रेणी
५	कनिष्ठ लिपिक	४	५२००-२०२०० + ग्रेड पे १९००
६	बेलिफ	२	५२००-२०२०० + ग्रेड पे १९००
७	शिपाई	२	४४००-७४०० + ग्रेड पे १३००
	एकूण	१३	

२. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कोरपना, जिल्हा चंद्रपूर हे न्यायालय सुरु होण्याच्या दिनांकापासून ग्रामन्यायालय कोरपना, जिल्हा चंद्रपूर यांच्यासाठी निर्माण करण्यात आलेली पदे निरस्त होतील. तसेच, ग्रामन्यायालय कोरपना, जिल्हा चंद्रपूर यांचेसाठी पुरविण्यात आलेल्या वाहन, फॅक्स मशीन, फ्रँकींग मशीन, संगणक, प्रिंटर्स इ. सुविधा दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय कोरपना, जिल्हा चंद्रपूर या न्यायालयास हस्तांतरीत करण्यात याव्या.

३. यासाठी होणारा खर्च निधिची तरतुद झाल्यानंतर संबंधित आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून "मागणी क्रमांक जे-१, २०१४-न्यायदान (००) (१०५) दिवाणी व सत्र न्यायालये (०२) जल्हिा व सत्र न्यायाधिश (०२)(०१) जिल्हा व सत्र न्यायाधिश (२०१४ ०१७२) दत्तमत" या लेखाशीर्षाखालील उद्दीष्टांसाठी अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २६३/व्यय-५, दिनांक ०७.०३.२०१८ व अनौपचारिक संदर्भ क्रमांक २०२/२०१८/आपुक, दिनांक ०७.०३.२०१८अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१०१५३२४००२१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amogh
Shyamkant
Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2018.04.10 15:34:18 +05'30'

(अ. श्यां. कलोती)

विधि सल्लागार नि सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई,
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
५. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय मुंबई,
७. सर्व अ.मु.स. / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. सदस्य सचिव, विधि सेवा प्राधिकरण, मुंबई,
९. संचालक, अभियोग संचालनालय, मुंबई,
१०.प्रबंधक, उच्च न्यायालय मुंबई, नागपूर, औरंगाबाद व पणजी खंडपीठ,
११.सर्व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालये,
१२.सह संचालक, न्यायिक अधिकारी, प्रशिक्षण संस्था उत्तन / नागपूर,
१३.महालेखापाल १ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
१४. महालेखापाल २, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
१५.अधिदान व लेखा अधिकारी मुंबई,
१६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१७.जिल्हा कोषगा ार अधिकारी चंद्रपूर,
१८. उप जिल्हा कोषागार अधिकारी कोरपना, चंद्रपूर,
१९.वित्त विभाग, व्यय ५/आ.पु.क., मंत्रालय, मुंबई,
२०.विधि व न्याय विभागातील सर्व कार्यासने,
२१.निवडनस्ती (का.१२).